Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

जळगाव पोलिसांचा 'ॲक्शन मोड'!



(पान २ वर)

।सोमवार, दि. ४ मे २०२६। वर्ष १ ।अंक २९ ।पाने २। DIGITAL EDITION

» Selected

## एसी स्फोटाने भीषण आग; 9 जणांचा मृत्यू

नवी दिल्ली: विवेक विहार परिसरात एका इमारतीला लागलेल्या भीषण आगीत ९ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.(एसी) स्फोट झाल्यामुळे ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून आग विझवली असून, या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## हिमाचलमध्ये बस चालवत असतानाच चालकाला झटका

सिमला: हिमाचल प्रदेशातील कांगडा येथे एक मोठी दुर्घटना घडली आहे. प्रवाशांनी भरलेल्या बसच्या चालकाला गाडी चालवत असतानाच अचानक हृदयविकाराचा झटका आला, ज्यामुळे बसवरील नियंत्रण सुटून ती उलटली. या अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### द्रुतगती मार्गावर वाहन थांबवणे धोकादायक: पोलिसांकडून मोठी कारवाई

# 'मिसिंग लिंक'वर सेल्फी अन् फोटो काढण्यास मज्जाव!

## अन्यथा महागात पडणार; ; २४x७ सीसीटीव्ही नजरेतून कारवाई

करण (गुरु) शिंदे
जन सम्राट टाईम्स

मुंबई | यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंकच्या ( मिसिंग लिंक ) लोकार्पणानंतर वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. मात्र प्रवासादरम्यान सेल्फी, फोटो, घेण्यासाठी वाहनचालक केबल स्टेड ब्रिज व बोगद्याजवळ वाहने थांबवत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. द्रुतगती मार्गावर वाहने थांबवण्यास परवानगी नसून वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका असल्याने ते टाळावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने करण्यात येत आहे.

1 मे महाराष्ट्र दिनी रोजी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे मार्गावरील कनेक्टिंग लिंक अर्थात 'मिसिंग लिंक'चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले. महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मर्यादा जाहीर केली आहे. तसेच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी 100 किमी वेग मर्यादा आणि बस व प्रवासी वाहनांसाठी ताशी 80 किमी वेग निश्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे व दोन पुलावर पूर्णपणे 24x7 सीसीटीव्ही यंत्रणेचे लक्ष आहे. यावर देखरेख



ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे.

सेल्फी, फोटो आणि रिल काढण्यासाठी थांबू नका नाहीतर मोठ्या दंडाची आकारणी होऊ शकते. तसेच तुमच्यासह इतरांच्याही वाहनांना धोका होऊ शकतो. या कारणास्तव, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित, सुखकर प्रवास करा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

'मिसिंग लिंक' प्रकल्प मुंबईच्या बाजूकडील खोपोलीला पुणे जिल्ह्यातील लोणावळ्याजवळील कुसगावला जोडतो. यामुळे द्रुतगती मार्ग पूर्णपणे प्रवेश नियंत्रित होईल आणि घाटावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

सहा हजार 700 कोटींचा खर्च महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) सहा हजार 700 कोटी खर्च करून विकसित केलेल्या या प्रकल्पात दोन बोगदे, दोन पूल आणि टायगर व्हॅलीवरील एका केबल-स्टेड पुलाचा समावेश आहे. यामुळे तीव्र उतार असलेल्या आणि अपघातप्रवण खंडाळा किंवा भोर घाट भागाला वळसा घालून एक नवीन मार्ग उपलब्ध झाला आहे, जिथे विशेषतः शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये अनेकदा वाहतूक कोंडी होते.

### सहा किलोमीटर अंतर कमी

'हा प्रकल्प 19.16 किलोमीटर लांबीच्या आधुनिक कॉरिडॉरचा एक भाग आहे', असे एम.एस.आर.डी.सी.ने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, 'या 'मिसिंग लिंक'मुळे मुंबई-पुणे प्रवासाचे अंतर सुमारे सहा किलोमीटरने कमी होईल आणि प्रवासाचा वेळ 20 ते 30 मिनिटांनी कमी होईल'.

### ताशी 80 किमी वेग निश्चित

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले. महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मर्यादा जाहीर केली आहे. तसेच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी 100 किमी वेग मर्यादा आणि बस व प्रवासी वाहनांसाठी ताशी 80 किमी वेग निश्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे व दोन पुलावर पूर्णपणे 24x7 सीसीटीव्ही यंत्रणेचे लक्ष आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# भारतीय अंतराळ क्षेत्राची ऐतिहासिक झेप!

## 'ऑप्टो सार' उपग्रह 'मिशन दृष्टी' यशस्वी

जन सम्राट टाईम्स

श्रीहरिकोटा / बेंगळुरू : भारतीय अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातील (स्पेस-टेक) स्टार्ट-अपने आज जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. आयआयटी मद्रास येथील 'गॅलेक्सआय' या कंपनीने 'मिशन दृष्टी' यशस्वीरित्या प्रक्षेपित केले. हा उपग्रह केवळ जगातील पहिला 'ऑप्टो सार' इमेजिंग उपग्रह नसून, भारतातील खाजगी क्षेत्राद्वारे निर्मित आतापर्यंतचा सर्वात मोठा उपग्रह ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल गॅलेक्सआयच्या टीमचे विशेष कौतुक करत याला राष्ट्रनिर्माणातील एक महत्त्वाचा टप्पा म्हटले आहे.

काय आहे 'ऑप्टो सार' तंत्रज्ञान? 'मिशन दृष्टी' उपग्रहाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील ऑप्टो सार (OPTOSAR) तंत्रज्ञान. हे तंत्रज्ञान हाय-रिझोल्यूशन 'ऑप्टिकल कॅमेरा' आणि 'सिंथेटिक अपर्चर रडार' (सार) या दोन्ही प्रणालींना एकाच उपग्रहात एकत्रित करते.

हवामानाचे बंधन नाही: साधारणपणे ढगाळ हवामान किंवा रात्रीच्या वेळी उपग्रहाद्वारे स्पष्ट फोटो घेणे कठीण असते. मात्र, ऑप्टो सार मुळे ढगांच्या आड आणि अंधारातही अत्यंत स्पष्ट प्रतिमा (इमेजिंग) मिळवणे शक्य होणार आहे.



### पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून अभिनंदन

आतापर्यंत भारतीय अंतराळ क्षेत्रात अनेक खासगी उपग्रह प्रक्षेपित झाले आहेत, मात्र 'मिशन दृष्टी' हा आकाराने आणि क्षमतेने आतापर्यंतचा सर्वात मोठा उपग्रह आहे. हा उपग्रह पूर्णपणे भारतात विकसित करण्यात आला असून, यामुळे उपग्रह निर्मितीच्या क्षेत्रात भारताचे स्वावलंबन अधोरेखित झाले आहे. पंतप्रधानांनी सोशल मीडियाद्वारे गॅलेक्सआयच्या संस्थापक आणि वैज्ञानिकांचे अभिनंदन केले. त्यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे की, "गॅलेक्स आय"चे 'मिशन दृष्टी' हे आपल्या अंतराळ प्रवासातील एक महत्त्वपूर्ण यश ठरले आहे. आपल्या युवा पिढीची नवनिर्मिती आणि राष्ट्रनिर्माणाप्रती असलेली जिद्द व तळमळ यातून दिसून येते.

# मार्टा कोस्त्युकचा माद्रिद ओपनवर कब्जा

जन सम्राट टाईम्स

माद्रिद | प्रतिनिधी : युक्रेनची युवा टेनिसपटू मार्टा कोस्त्युक हिने शानदार कामगिरी करत माद्रीद ओपन 2026 स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. अवघ्या २३व्या वर्षी तिने आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठा किताब जिंकत जागतिक टेनिस विश्वात दमदार ठसा उमटवला आहे.

महिला एकेरीच्या अंतिम फेरीत कोस्त्युकने जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानी असलेल्या मीरा अ‍ॅण्ड्रीव्ह हिचा ६-३, ७-५ अशा सरळ सेटमध्ये पराभव केला. सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत कोस्त्युकने प्रतिस्पर्ध्यावर वर्चस्व राखले आणि पहिला सेट सहज जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये आंद्रीयेवाने पुनरागमनाचा प्रयत्न करत सामना चुरशीचा केला, मात्र निर्णायक क्षणी कोस्त्युकने अचूक सर्व्हिस आणि दमदार फोरहँडच्या जोरावर बाजी मारली. तिच्या संयमित आणि आत्मविश्वासपूर्ण खेळामुळेच हा विजय शक्य झाला. या विजयामुळे कोस्त्युकच्या कारकिर्दीला नवे वळण मिळाले असून, आगामी ग्रँड स्लॅम स्पर्धांसाठी ती एक मजबूत दावेदार ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत. तिच्या या यशाचे टेनिस जगतातून कौतुक होत असून, युक्रेनसाठीही हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

# धावत्या विमानातून प्रवाशाची इमर्जन्सी दारातून उडी

## चेन्नई विमानतळावर थरार; एअर अरेबियाच्या फ्लाईटमधील घटनेने खळबळ

शंकर जोग
जन सम्राट टाईम्स

चेन्नई ।प्रतिनिधी चेन्नई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी पहाटे एका प्रवाशाने चालत्या विमानातून चक्क आपत्कालीन दरवाजा (इमर्जन्सी एक्झिट) उघडून उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकारामुळे विमानतळ परिसरात आणि विमानातील इतर प्रवाशांमध्ये प्रचंड घबराट पसरली होती. मिळालेल्या माहितीनुसार, एअर अरेबियाचे विमान (फ्लाईट जी ९-४७१) शारजाहून चेन्नईला आले होते. विमान धावपट्टीवर उतरल्यानंतर टॅक्सी-वे वरून



टर्मिनल (पार्किंग बे) कडे जात असताना ही घटना घडली. विमान पूर्णपणे थांबण्यापूर्वीच एका प्रवाशाने अचानक विमानाचा आपत्कालीन दरवाजा उघडला आणि खाली उडी मारली. उडी मारणारा प्रवासी तमिळनाडूचा रहिवासी असल्याचे समजते. विमानातून उडी मारताच तेथे तैनात असलेल्या सीआयएसएफ जवानांनी तातडीने त्याला ताब्यात घेतले. सुदैवाने, विमान संथ गतीने चालले असल्याने प्रवाशाला गंभीर दुखापत झाली नाही, मात्र त्याच्या या कृत्यामुळे विमानातील इतर प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. विमानतळावर अफरा-तफरीचे वातावरण प्रवाशाने अचानक दरवाजा उघडल्याने विमानात 'अलार्म' वाजला, ज्यामुळे इतर प्रवासी आणि केबिन क्रूमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. विमानतळ सुरक्षा यंत्रणांना तात्काळ सतर्क करण्यात आले. मानसिक तणावातून किंवा इतर कोणत्या कारणामुळे त्याने हे कृत्य केले का, याचा तपास पोलीस आणि विमानतळ सुरक्षा अधिकारी करत आहेत. नागरी विमानचालन महासंचालनालयाने (डीजीसीए) या गंभीर सुरक्षा उल्लंघनाची दखल घेतली असून सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

# 'नीट' परीक्षेत 'फिजिक्स'ने विद्यार्थ्यांना हैराण : यंदाचा पेपर कठीण आणि वेळखाऊ!

जन सम्राट टाईम्स

मुंबई | विशेष प्रतिनिधी: नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) तर्फे घेण्यात आलेली 'नीट-युजी २०२६' ही वैद्यकीय प्रवेश परीक्षा रविवारी देशभरात पार पडली. यंदा साधारण २३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. प्राथमिक विश्लेषणानुसार, यंदाचा पेपर गेल्या वर्षीच्या तुलनेत काहीसा कठीण आणि वेळखाऊ होता. विषयनिहाय काठीण्य पातळी पाहता अनेक विद्यार्थ्यांना फिजिक्स कठीण, तर बायोलॉजी सोपा गेला. विद्यार्थी आणि शिक्षण तज्ज्ञांच्या मते, पेपरचे स्वरूप संमिश्र होते.

शिक्षण तज्ज्ञांच्या मते, पेपरची काठीण्य पातळी पाहता यंदाचा सरासरी कट-ऑफ गेल्या वर्षीच्या तुलनेत थोडा खाली येऊ शकतो किंवा स्थिर राहू शकतो. ज्या विद्यार्थ्यांनी एनसीईआरटीचा सखोल अभ्यास केला आहे, त्यांना केमिस्ट्री आणि बायोलॉजीमध्ये चांगले गुण मिळतील, असे नवी मुंबई परिसरातील एका नामांकित शाळेतील शिक्षिका प्रा. दीपाली सोनवणे-पाटील यांनी सांगितले. नीट परीक्षेचा विषयनिहाय आढावा *



भौतिकशास्त्र: बहुतांश विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्राचा पेपर सर्वात कठीण असल्याचे सांगितले. गणितावर आधारित (कॅलक्युलेटीव्ह) प्रश्नांची संख्या जास्त असल्याने विद्यार्थ्यांना वेळ कमी पडला. प्रा. सोनवणे-पाटील यांच्या मते, काही प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे होते.हा पेपर मध्यम स्वरूपाचा होता. यामध्ये 'ऑरगॅनिक' आणि 'इनऑरगॅनिक' केमिस्ट्रीचे प्रश्न थेट एनसीईआरटी पुस्तकांवर आधारित होते, परंतु 'फिजिकल केमिस्ट्री'चे प्रश्न थोडे वेळखाऊ होते. जीवशास्त्राचा पेपर तुलनात्मकदृष्ट्या सोपा होता. मात्र, विधाने आणि कारणेप्रकारचे प्रश्न जास्त असल्यामुळे तो वाचण्यात अधिक वेळ गेला.

### विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया: गेल्या वर्षीपेक्षा कठीण?

काही विद्यार्थ्यांनी सांगितले की, २०२५ च्या तुलनेत २०२६ चा पेपर अधिक आव्हानात्मक होता. विशेषतः फिजिक्समधील लांबलचक कॅल्क्युलेशन्समुळे अनेक विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटले. "बायोलॉजी सोपा होता, पण फिजिक्सने खऱ्या अर्थाने कसरत करायला लावली," अशी प्रतिक्रिया नवी मुंबईतील एका केंद्रावर परीक्षार्थीने दिली. * प्रोव्हिजनल ॲन्सर की: नॅशनल टेस्टिंग एजन्सी साधारणपणे परीक्षेच्या २ ते ३ आठवड्यांनंतर अधिकृत 'प्रोव्हिजनल ॲन्सर की' प्रसिद्ध करते, अशी माहिती प्रा. दीपाली सोनवणे-पाटील यांनी दिली. म्हणजेच, मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जूनच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना उत्तरे तपासता येतील.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# LSE, लंडन स्कूलच्या नजरेतून बाबासाहेब आंबेडकर

## "लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स", जिथे होणार आहे आंबेडकर रिसर्च चेअर

डॉ. संग्राम पाटील
जन सम्राट टाईम्स

लंडन । प्रतिनिधी : महाराष्ट्र सरकार 37 कोटी रुपये खर्चून लंडनमधील जगविख्यात "लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स" (LSE) या संस्थेत आंबेडकर स्टडी अँड रिसर्च चेअर स्थापणार आहे. या कॉलेजमध्ये बाबासाहेबांनी शिक्षण घेतले होते. LSE च्या अधिकृत प्रकाशनात "डॉ. भीमराव रामजी आंबेडकर" या लेखातून बाबासाहेबांची माहिती दिली आहे. भीमराव रामजी आंबेडकर (१८९१-१९५६) हे एक भारतीय कायदेपंडित, अर्थशास्त्रज्ञ, समाजसुधारक आणि राजकीय नेते होते. भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार आणि दलितांच्या (किंवा वसाहतवादी भारतात ज्यांना 'अस्पृश्य' म्हटले जायचे) हक्कांचे खंदे समर्थक म्हणून ते कदाचित सर्वाधिक ओळखले जातात. आंबेडकरांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून (LSE) १९२१ मध्ये पदव्युत्तर पदवी (मास्टर) आणि १९२३ मध्ये पीएचडी पूर्ण केली. भारतीय स्वातंत्र्यापूर्वीच्या चर्चांमध्ये आंबेडकरांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उदाहरणार्थ, १९३० च्या दशकाच्या सुरुवातीला भारताच्या घटनात्मक दर्जावरील गोलमेज परिषदेत सहभागी होण्यासाठी ब्रिटिशांनी निवडलेल्या दोन अस्पृश्य प्रतिनिधींपैकी ते एक होते. तसेच, त्यांनी १९४७ ते १९५१ या काळात वसाहतोत्तर भारतातील पहिले कायदा



आणि न्याय मंत्री म्हणूनही काम पाहिले.ब्रिटिशांच्या दृष्टीने 'कनिष्ठ खेडेगावातील नोकर' मानल्या जाणाऱ्या महार या खालच्या जातीचे असूनही, आंबेडकरांचे वडील भारतीय सैन्यात अधिकारी झाले होते आणि त्यांनी आपल्या मुलांनी शिक्षण घ्यावे असा आग्रह धरला, त्यामुळे आंबेडकरांना शाळेत जाण्याची परवानगी मिळाली. आंबेडकर हे त्यांच्या समाजातील माध्यमिक शिक्षण पूर्ण करणारे पहिले व्यक्ती होते आणि पुढे त्यांनी मुंबई विद्यापीठात अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयात बी.ए.चे शिक्षण घेतले, जिथे त्यांची भेट बडोदा संस्थानाचे महाराजा सयाजीराव तिसरे यांच्याशी झाली. महाराजा हे सामाजिक सुधारणांचे, ज्यात अस्पृश्यता निर्मूलनाचाही समावेश होता, सक्रिय पुरस्कर्ते होते. त्यांनी आंबेडकरांच्या पुढील शिक्षणासाठी परदेशात मदत केली; प्रथम न्यूयॉर्कमधील कोलंबिया विद्यापीठात, जिथे त्यांनी पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी पूर्ण केली, आणि नंतर एलएसईमध्ये. या काळात, आंबेडकरांनी अर्थशास्त्र, इतिहास आणि राज्यशास्त्र यांचा अभ्यास केला आणि भारतातील जातीव्यवस्थेच्या इतिहासासह विविध विषयांवर लेखन केले.

याच काळातील त्यांच्या पत्रांमधून, प्रगतीचा मार्ग म्हणून शिक्षणावरील त्यांच्या विश्वासाचा पुरावा देखील मिळतो, ज्यात विशेषतः स्त्री शिक्षणावर त्यांचा भर होता. पुढील वीस वर्षांत, त्यांनी अस्पृश्यांना संघटित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी दलित वृत्तपत्रे, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्था स्थापन केल्या, मागासलेल्या वर्गांच्या अधिक परिषदांना हजेरी लावली, मंदिर प्रवेश आणि पाणीपुरवठ्यातील भेदभावाविरुद्ध आंदोलने सुरू केली, आणि दलितांना शिक्षण मिळावे यासाठी तळमळीने प्रयत्न केले.

### संविधानाच्या अनेक पैलूंमध्ये बाबासाहेबांचा प्रभाव

कॉंग्रेसशी मतभेद असूनही, ऑगस्ट १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पंतप्रधान नेहरूंनी त्यांना पहिले कायदा व न्याय मंत्री होण्यासाठी आमंत्रित केले. त्यानंतर लगेचच, संविधान सभेने आंबेडकरांची नवीन संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली.परिणामी निर्माण झालेल्या भारतीय संविधानाच्या अनेक पैलूंमध्ये आंबेडकरांचा प्रभाव दिसून येतो, जसे की - उदारमतवादी लोकशाहीवर दिलेला जोरदार भर, संघराज्यीय रचना, अल्पसंख्याकांसाठीच्या तरतुदी व संरक्षण आणि त्याचबरोबर अस्पृश्यतेचे ठामपणे केलेले निर्मूलन!

# इराणचा नवा १४ कलमी शांतता प्रस्ताव

जन सम्राट टाईम्स

वॉशिंग्टन/तेहरान | प्रतिनिधी : अमेरिका आणि इराणमधील तणाव निवळण्यासाठी राजनैतिक हालचालींना वेग आला आहे. इराणने अमेरिकेसमोर एक नवा १४ कलमी शांतता प्रस्ताव ठेवला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या प्रस्तावाचा आढावा घेण्याचे मान्य केले आहे.

मात्र, या कराराच्या यशाबाबत ट्रम्प यांनी स्पष्टपणे साशंकता व्यक्त केली आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, ते इराणच्या प्रस्तावावर चर्चा करण्यास तयार आहेत, परंतु इराणच्या हेतूंवर त्यांचा विश्वास नाही. "आम्ही प्रस्तावाचा अभ्यास करू, पण तो कितपत व्यवहार्य आहे, याबाबत मी साशंक आहे," असे ट्रम्प यांनी नमूद केले. इराणने सादर केलेला हा प्रस्ताव जुन्या मागण्यांपेक्षा वेगळा असल्याचे सांगण्यात येत आहे.

यात प्रामुख्याने होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणे आणि अणुकार्यक्रम चर्चा या मुद्द्यांचा समावेश आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी या महत्त्वाच्या जलमार्गाच्या सुरक्षेबाबत आणि व्यापाराच्या सुलभतेबाबत एका विशेष कराराचे संकेत दिले आहेत.

दुसरीकडे, अमेरिका आणि इराणमध्ये चर्चेच्या क्रमावरून मतभेद आहेत. इराणला आधी निर्बंधांमधून सवलत हवी आहे, तर अमेरिकेने अणुकार्यक्रमावर आधी ठोस मर्यादा घालण्याचा आग्रह धरला आहे.

व्हाईट हाऊसने या शांतता चर्चेसाठी राजनैतिक संघात निक स्टुअर्ट यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. स्टुअर्ट यांनी यापूर्वी ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात इराणशी संबंधित विषयांवर स्टेट डिपार्टमेंटमध्ये काम केले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे अमेरिका हा विषय गांभीर्याने हाताळत असल्याचे दिसून येत आहे.

Selected

## यादवांकडून दलित, अल्पसंख्याकांवर अत्याचार केला !

बलिया : (उत्तर प्रदेश) | "यादवांनी दलित, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याकांवर अत्याचार केला," असे उत्तर प्रदेश सरकारचे मंत्री आणि सुहेलदेव भारतीय समाज पक्षाचे अध्यक्ष ओम प्रकाश राजभर यांनी म्हटले आहे. त्यांनी सांगितले की, यादवांनी सर्वप्रथम मुघल सैन्यात सामील होऊन मागास वर्ग, दलित आणि अल्पसंख्याकांवर अत्याचार केले आणि नंतर ब्रिटिश सैन्यातही तीच भूमिका बजावली. उत्तर प्रदेशात आजही यादवांकडून अत्याचाराच्या घटना सुरू असल्याचा आरोप राजभर यांनी केला. यासाठी त्यांनी बाराबंकी आणि मऊ येथील घटनांचा उल्लेख केला. शनिवारी रसरा येथे माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. स्मार्ट मीटरबाबत सपा प्रमुख अखिलेश यादव यांच्या वक्तव्यावर राजभर म्हणाले की, अखिलेश यादव यांचे आता फक्त पत्रकार परिषदा घेणे आणि सोशल मीडियावर लिहिणे, हेच काम उरले आहे. व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरवाढीच्या प्रश्नावर ते म्हणाले की, जे लोक महागाईबद्दल आरडाओरडा करतात, त्यांनी १५ वर्षे मागे जाऊन परिस्थितीशी तुलना करावी. राजभर यांनी दावा केला की, गावांमध्ये मोटारसायकल आणि चारचाकी वाहनांची संख्या वाढली असून लोकांची क्रयशक्तीही वाढली आहे.

# जळगाव पोलिसांचा 'ॲक्शन मोड'!

## तीन दिवसांत २४ गुन्हे, २५ आरोपी अटकेत; ६१ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स

**पुणे ।** जळगाव जिल्ह्यात अवैध गोवंश वाहतूक आणि कत्तलीविरोधात पोलिसांनी आक्रमक भूमिका घेत मोठी धडक कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या विशेष मोहिमेत तस्करांचे जाळे उध्वस्त करण्यात आले असून, मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ३० एप्रिल ते २ मे या कालावधीत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही मोहीम राबवण्यात आली. धरणगाव, यावल, शनिपेठ, भडगाव, चाळीसगाव, रावेर, पाचोरा आणि एमआयडीसी परिसरात पोलिसांनी एकाच वेळी धाडी टाकत तस्करांना गाठले. या कारवाईत एकूण २४ गुन्हे दाखल करण्यात आले असून २५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या मोहिमेतील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पोलिसांनी ७८ जिवंत जनावरांची (गाय, बैल, गोऱ्हे व म्हशी) सुटका केली. तसेच ४६३ किलो अवैध गोमांस हस्तगत करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या जनावरांची आणि मांसाची किंमत सुमारे १५ लाख



२३ हजार २३० रुपये इतकी आहे. याशिवाय, अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली १४ वाहने जप्त करण्यात आली असून त्यांची किंमत ४६ लाख १० हजार रुपये आहे. एकूण कारवाईची किंमत तब्बल ६१ लाख ३३ हजार २३० रुपये इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणात "महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, २०१५" तसेच भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत कठोर कलमांचा वापर करण्यात आला आहे. जप्त वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभागामार्फत दंडात्मक कारवाई देखील करण्यात येणार आहे. पोलीस प्रशासनाने स्पष्ट इशारा देत सांगितले की, अवैध गोवंश वाहतूक व कत्तल करणाऱ्यांवर कोणतीही दया दाखवली जाणार नाही.

अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर आणि संदिप गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली असून, जिल्ह्यात अशा प्रकारच्या मोहिमा यापुढेही सातत्याने राबवण्यात येणार आहेत.या धडक कारवाईमुळे तस्करांचे धाबे दणाणले असून, कायद्याचा धाक निर्माण करण्यात पोलिसांना यश आले आहे.

### कडक कायद्याचा वापर

तस्करांविरुद्ध केवळ गुन्हे दाखल न करता, महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारित) अधिनियम २०१५ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कठोर कलमांचा वापर करण्यात आला आहे. जप्त केलेल्या वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभागामार्फत दंडात्मक कारवाई देखील केली जाणार आहे. जिल्हा पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, गोवंश हत्या आणि अवैध वाहतूक करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर आणि संदिप गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. जिल्ह्यात अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही निरंतर सुरू राहतील, असा सज्जड इशारा पोलीस प्रशासनातर्फे देण्यात आला आहे.

# पाच राज्यातील सत्तेचा आज फैसला!; तामिळनाडूत 'थलापती' विजयची प्रतिष्ठा पणाला

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली।/कोलकाता | प्रतिनिधी** देशाचे लक्ष लागून राहिलेल्या पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुडुचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा निकाल आज, सोमवारी, ४ मे रोजी जाहीर होणार आहे. सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार असून दुपारपर्यंत सत्तेचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे. या निकालांचा परिणाम राष्ट्रीय राजकारणावरही होणार असल्याने राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता आहे. सकाळच्या सत्रात १० ते ११ च्या सुमारास प्राथमिक कल हाती येतील. दुपारी २ वाजेपर्यंत बहुतांश राज्यांचे स्पष्ट चित्र समोर येईल. मात्र, चुरशीच्या लढती असलेल्या बंगालसारख्या राज्यात अंतिम निकालासाठी उशिरा रात्रीपर्यंत वाट पाहावी लागू शकते. सर्वात मोठी चुरस पश्चिम बंगालमध्ये पाहायला मिळत आहे. २९४ जागांच्या या विधानसभेत सत्ता स्थापनेसाठी १४८ हा बहुमताचा आकडा गाठणे आवश्यक आहे. तृणमूल काँग्रेस (टीएमसी) आणि भाजपमध्ये थेट लढत असून, एक्झिट पोलनुसार



दोन्ही पक्षांमध्ये अत्यंत कमी मतांचे अंतर राहण्याची शक्यता आहे. काही रिपोर्ट्सनुसार, भाजपला यंदा किरकोळ आघाडी मिळण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.
* विक्रमी मतदान: यंदा बंगालमध्ये ९२.४९% इतके विक्रमी मतदान झाले आहे, जे २०११ च्या विक्रमी मतदानापेक्षाही जास्त आहे. या वाढलेल्या मतदानाचा फायदा कोणाला होणार, याबाबत तर्क-वितर्क लढवले जात आहेत.
* अपवाद: बंगालमधील 'फालता' मतदारसंघात २१ मे रोजी फेरमतदान होणार असल्याने, त्याचा निकाल २४ मे रोजी जाहीर होईल.

तामिळनाडूच्या राजकारणात यंदा मोठा बदल पाहायला मिळत आहे. सुपरस्टार विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कळघम' ('टीव्हीके') या पक्षाने पहिल्यांदाच निवडणूक लढवली आहे.
* विजय यांचा करिष्मा: तामिळनाडूत सत्ताधारी डीएमके आणि प्रमुख विरोधी पक्ष एआयएडीएमके यांच्या परंपरागत लढतीत विजय यांनी तिसरा पर्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.
* निर्णायक भूमिका: ग्राउंड रिपोर्टनुसार, विजय यांचा पक्ष अनेक जागांवर 'किंगमेकर' ठरण्याची शक्यता आहे. युवकांचा त्यांना असलेला मोठा पाठिंबा निकालात किती परावर्तित होतो, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष आहे. केरळ (१४० जागा): येथे सत्तांतर होणार की एलडीएफ पुन्हा इतिहास रचणार, याची उत्सुकता आहे. आसाम (१२६ जागा): ईशान्य भारतातील या महत्त्वाच्या राज्यात भाजप आपली सत्ता राखण्यात यशस्वी होते का, हे आज स्पष्ट होईल. पुडुचेरी (३० जागा): या केंद्रशासित प्रदेशातही आज मतमोजणी पार पडणार आहे.

त्रिस्तरीय सुरक्षा: मतमोजणी केंद्राबाहेर केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सीएपीएफ) आणि स्थानिक पोलिसांची कडक सुरक्षा असेल. मोजणीची प्रक्रिया: सकाळी ८:०० वाजता प्रथम टपाल मतपत्रिकांची मोजणी होईल. त्यानंतर ८:३० वाजता ईव्हीएम मधील मतांची मोजणी सुरू केली जाईल.
* पारदर्शकता: प्रत्येक फेरीचे निकाल निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर (results.eci.gov.in) रिअल-टाईम अपडेट केले जातील. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील ५ रँडमली निवडलेल्या मतदान केंद्रांच्या व्हीव्हीपॅट स्लिप्सचीही पडताळणी केली जाईल.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# सोन्याच्या दरात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता!

## बँकांनी शिपमेंट रोखल्याने देशात पुरवठा टंचाई

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** भारतातील सोन्याच्या बाजारात सध्या मोठी अस्वस्थता पाहायला मिळत आहे. बँकांनी सोन्याच्या नव्या आयातीला पूर्णपणे स्थगिती दिली आहे. यामुळे अनेक टन सोने कस्टममध्ये अडकून पडल्याने देशांतर्गत बाजारात सोन्याची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. एप्रिल महिन्यातील सोन्याची आयात गेल्या ३० वर्षांतील नीचांकी पातळीवर पोहोचली असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. सध्या सुमारे १८ बँकांना आयातीसाठी नवीन परवानगी मिळाली असली, तरी ३% आयजीएसटीचा मुद्दा अद्याप सुटलेला नाही. जर हा कर रद्द झाला नाही किंवा त्यावर स्पष्टता आली नाही, तर येत्या काळात सोन्याच्या पुरवठ्यात आणखी कपात होऊ शकते, ज्यामुळे जागतिक आणि देशांतर्गत किमतींमध्ये मोठी अस्थिरता दिसून येईल. बँकांनी सोन्याचे शिपमेंट रोखण्यामागे दोन प्रमुख कारणे समोर आली आहेत - * ३% आयजीएसटीची नवी मागणी: २०१७ पासून बँकांना सोन्याच्या आयातीवर 'एकीकृत वस्तू आणि सेवा कर' (आयजीएसटी) मधून सवलत होती. मात्र, नुकतीच कस्टम विभागाने बँकांकडून ३% आयजीएसटी ची मागणी केल्यामुळे बँकांनी सोन्याची शिपमेंट क्लिअर करणे थांबवले आहे. * डीजीएफटीकडून विलंब: नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला 'डायरेक्टरेट जनरल ऑफ फॉरेन ट्रेड' (डीजीएफटी) कडून बँकांना सोने आयातीसाठी नवीन अधिकृत परवानगी मिळणे आवश्यक असते. या प्रक्रियेत झालेल्या विलंबामुळे साधारण ५ टन सोने आणि ८ टन चांदी कस्टम क्लिअरन्सविना बंदरांवर पडून आहे. बाजारावर होणारा परिणाम: ३० वर्षांतील निच्चांकी आयात * आयातीत घट: एप्रिल २०२६ मध्ये भारताची सोन्याची आयात केवळ १५ मेट्रिक टन राहण्याचा अंदाज आहे.



### बँकांनी सोने आयात का रोखली?

गेल्या वर्षी याच काळात ३५ टन आयात झाली होती. सरासरी ६० टन प्रति महिना असणारी आयात आता प्रचंड घटली आहे. किमतींवर परिणाम: पुरवठा कमी झाल्यामुळे स्थानिक सराफा बाजारात सोन्याच्या 'प्रीमियम'मध्ये (अतिरिक्त किंमत) वाढ होण्याची शक्यता आहे. ग्राहकांसाठी सोने खरेदी अधिक महाग होऊ शकते.

# सोनाई इंग्लिश मीडियम स्कूलचा बारावीला शंभर टक्के निकाल!

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (HSC) २ मे २०२६ रोजी जाहीर झालेल्या बारावी परीक्षेच्या निकालात हडपसर-भेकराईनगर येथील सोनाई इंग्लिश मीडियम हायस्कूल व सायन्स ज्युनिअर कॉलेजने पुन्हा एकदा शंभर टक्के निकाल लावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे परिसरात शाळेचे कौतुक होत असून विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या वर्षीच्या निकालात दृष्टी सुनील रोकडे हिने ८५ टक्के गुण मिळवत अव्वल स्थान पटकावले. हर्षवर्धन किशोर शिंदे याने ८१.५० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर वेदांत रामदास भिसे याने ७८.६७ टक्के गुण मिळवत तृतीय स्थान मिळवले. सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत संस्थेची परंपरा कायम राखली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थापक अध्यक्ष ए. एल. नर्सिंग राव आणि ट्रस्टी राज लक्ष्मणराव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शनही करण्यात आले. "कठोर परिश्रम, शिस्त आणि योग्य मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे," असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

# राज्यात पहिलीपासून तिसऱ्या भाषेचा मुद्दा यंदाच्या वर्षी बारगळण्याची चिन्हे; जाधव समितीच्या अहवाल

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न शाळांमध्ये पहिलीपासून तिसरी भाषा लागू करण्याचा मुद्दा यंदा बारगळण्याची चिन्हे आहेत. राज्यात हिंदीवरून वादंग टाळण्यासाठी माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव समितीने त्रिभाषा सूत्रासंदर्भात दिलेल्या अहवालावर राज्य सरकारने अद्याप निर्णय घेतलेला नाही. शाळांचे शैक्षणिक वर्ष जूनपासून सुरू होत असताना आता ऐनवेळी पहिलीपासून हिंदी किंवा अन्य तिसरी भाषा अनिवार्य केल्यास मोठा विरोध आणि गोंधळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षी कोणताही बदल न करता सध्याची पाचवीपासून तिसरी भाषा शिकविण्याचीच पद्धत कायम ठेवावी, अशी मागणी होत आहे.भाषा म्हणून हिंदी किंवा अन्य भाषा पहिलीपासून लागू करण्याचा निर्णय गेल्यावर्षी राज्य सरकारने घेतल्यावर जोरदार विरोध झाला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा वाद चिघळण्याची शक्यता असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिलीपासून तिसऱ्या भाषेचा निर्णय २९ जून २०२५ रोजी रद्द केला आणि डॉ. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त



केली. या समितीने आपला अहवाल ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सादर केला आहे. त्यावर शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही.सीबीएसईने तिसरी भाषा सहावीपासून अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने गेल्या काही वर्षांत केंद्रीय एनसीईआरटीचा अभ्यासक्रम लागू केला असून सीबीएसईच्या धर्तीवर राज्य मंडळांच्या शाळांसाठी निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यात सध्या पाचवीपासून हिंदी किंवा अन्य भाषा शिकविली जाते. त्यामुळे आता पहिलीपासून तिसरी भाषा सुरू करुन नवीन वादाला आमंत्रण नको, अशी सरकारची भूमिका असल्याचे उच्चपदस्थांनी सांगितले. पाच राज्यांच्या निवडणुकांच्या काळात राज्यात हिंदीविरोधात किंवा मराठी-अमराठी वाद निर्माण होऊ नये, असे सरकारचे प्रयत्न होते. सरनाईक यांनाही सबुरीची सूचना करण्यात आली व परवाना रद्द करण्याचा निर्णय १५ ऑगस्टपर्यंत लांबणीवर टाकण्यात आला. जाधव समितीच्या अहवालावर मंत्रिमंडळात निर्णय घेतला असता, तर नवीन वादाची भर पडली .

# भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावी निकालात झेंडा!

जन सम्राट टाईम्स

**जळगांव (पाळधी) | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या बारावी परीक्षेत भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील कनिष्ठ महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाचा विज्ञान आणि वाणिज्य शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून कला शाखेनेही ९८ टक्के निकालासह दमदार कामगिरी नोंदवली आहे. कला शाखेत कु. प्रांजली किरण महाजन हिने ८६.१७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर पूजा ज्ञानेश्वर भोई (८२.८३%) हिने द्वितीय आणि कु. दिपाली रवींद्र काकडे (७८.५०%) हिने तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत शुभम धनराज कासट (८०.८३%) प्रथम, पुनम विकास पाटील (७९.८३%) द्वितीय, तर रामचंद्र गणेश पाटील (७६.८३%) तृतीय ठरले. विज्ञान शाखेत कु. कादंबरी शामकांत पाटील हिने ८७% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. प्रणव विठ्ठल पाटील आणि कु. यज्ञा घनश्याम पाटील (दोघेही ८५.८३%) यांनी द्वितीय क्रमांक मिळवला, तर समर्थ सुगमचंद पाटील (८५.१७%) तृतीय ठरला.यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात प्राचार्य, समन्वयक व शिक्षकवृंद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेचे प्रेरणास्रोत गुलाबरावजी रघुनाथ पाटील, अध्यक्ष विक्रम पाटील, सचिव प्रतापराव पाटील तसेच प्राचार्य अजिंक्य जोशी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या बारावी परीक्षेत भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील कनिष्ठ महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या मेहनतीला आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला मोठे यश मिळाल्याचे स्पष्ट झाले.

# आधी नराधमाला फाशी द्या, मगच या...पीडित पित्याचा संताप

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** नसरापूर येथे नराधमाने क्रूरतेची सीमा गाठली आणि एका निष्पाप चिमुकलीचा बळी घेतला. आज या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घरातील वातावरण भयाण असावे, तिथे सध्या मात्र राजकीय नेते आणि सांत्वनासाठी येणाऱ्यांची वर्दळ सुरू आहे. या गर्दीत एक पिता आपली वेदना सावरत असून, त्याने राजकीय नेत्यांना भावनिक आवाहन केले आहे.नसरापूरच्या पीडित मुलीच्या वडिलांनी जड अंतःकरणाने आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, 'आज बरेच राजकारणी लोक भेटण्यास आणि सांत्वन करण्यास घरी येत आहेत. माझी व माझ्या कुटुंबीयांची एकच इच्छा आहे. जोपर्यंत माझ्या मुलीला न्याय मिळत नाही व त्या नराधमाला फाशीची शिक्षा होत नाही, तोपर्यंत एकाही राजकारणी नेत्याने आमच्या घरी येऊ नये. हे आमचे तुम्हाला हात जोडून नम्र आवाहन आहे.''ज्या दिवशी त्या नराधमाला फाशी होईल, त्याच दिवशी आम्ही सगळ्यांना भेटू,' असे म्हणत या पित्याने न्यायव्यवस्थेकडे आपला डोळा ठेवला आहे. हे आवाहन केवळ नेत्यांसाठी नाही, तर समाजासाठी आहे. एखाद्याचे दुःख हे कधीही राजकीय व्यासपीठ बनू नये, याची जाणीव प्रत्येकाला होणे गरजेचे आहे. आता प्रश्न उरतो तो हा की, हे नेते खरंच या कुटुंबाच्या वेदनेचा आदर करणार की, पुन्हा एकदा सांत्वनाच्या नावाखाली आपली उपस्थिती दर्शवून निघून जाणार? पीडित कुटुंब आता फक्त शांततेची आणि न्यायाची अपेक्षा करत आहे. समाजातील सुज्ञ नागरिकांनीही आता या सांत्वनाच्या राजकारणाकडे प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याची वेळ आली आहे. या घटनेमुळे राज्यात संतापाची लाट उसळली असून नराधमाला जलदरित्या फाशी देण्यात यावी, अशी मागणी जनसामान्याकडून प्रशासनाकडे केली जात आहे. शक्ती कायद्यात गुन्हेगाराला २१ दिवसांत फाशी देण्याची तरतूद आहे. मात्र, दुर्दैवाने हा कायदा केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित आहे. आज शक्ती कायदा राज्यात लागू असता, तर नसरापूरच्या त्या नराधमाला १५ ते २१ दिवसांत फाशीची शिक्षा झाली असती आणि अशा गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण झाला असता, असे राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी स्पष्ट केले आहे. मी काल स्वत: पीडितेच्या वडिलांशी दोनवेळा बोललो. मी त्यांना हे समजावून सांगितले, आपल्याला नराधमाला मृत्युदंडाची शिक्षा द्यायची आहे. त्यासाठी वेळेत चार्जशीट दाखल होणे आणि केस चालणे, माननीय हायकोर्टाच्या माध्यमातून सगळ्या गोष्टीला फास्ट ट्रॅकवर नेत आहोत. आपल्या सगळ्यांना वाटतं, अशा नराधमाला भरचौकात फाशी दिली पाहिजे. पण, ते लोकशाहीत करता येत नाही. लोकशाही कायद्याने चालते. पण, कोणालाही कायद्याचा दुरुपयोग करता येऊ नये, याद्दष्टीने कोणतीही पळवाट न ठेवता या नराधमाला मृत्युदंडाची शिक्षा कशी होईल, याचा प्रयत्न राज्य सरकार करेल. न्यायालयात हे प्रकरण वेगाने मार्गी लावले जाईल. तसे पत्र आम्ही पीडितेच्या कुटुंबाला दिले असून त्यांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे आहे, असे त्यांनी सांगितले.

# धाराशिव आणि हिंगोलीत इंधन आणीबाणी; पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक'चे फलक

## वाहनधारकांची मोठी तारांबळ; मोजक्या पंपांवर ३ ते ४ तासांच्या लांबच लांब रांगा

जन सम्राट टाईम्स

**धाराशिव/हिंगोली | प्रतिनिधी** महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात, विशेषतः धाराशिव आणि हिंगोली जिल्ह्यांत मागील ४८ तासांपासून पेट्रोल आणि डिझेलचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. अनेक पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक'चे फलक झळकल्याने वाहनधारकांची मोठी तारांबळ उडाली आहे. सुरू असलेल्या मोजक्या पंपांवर ३ ते ४ तासांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत.मे महिना हा खरीपपूर्व मशागतीचा काळ असल्याने शेतकरी ट्रॅक्टरसाठी डिझेलच्या शोधात आहेत. मात्र, डिझेल उपलब्ध नसल्याने पेरणीपूर्व कामे ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच, मालवाहू ट्रक आणि खाजगी ट्रॅव्हल्सची वाहतूकही विस्कळीत झाली असून जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

**महाराष्ट्राची रोजची गरज आणि पुरवठा स्थिती**

सरकारी आकडेवारी आणि ऑईल मार्केटिंग कंपन्यांच्या ताज्या अहवालानुसार -
* एमएसआरटीसी (एस. टी.) गरज: महाराष्ट्र राज्य मार्ग



परिवहन महामंडळाला (एस. टी.) दररोज सुमारे १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता असते. प्राधान्यक्रम: केंद्र सरकारच्या धोरणानुसार, सध्याच्या मर्यादित पुरवठ्यामुळे प्रथम संरक्षण दल, त्यानंतर रेल्वे आणि तिसऱ्या क्रमांकावर राज्य परिवहन यांना इंधन पुरवठ्यात प्राधान्य दिले जात आहे. यामुळे किरकोळ विक्री करणाऱ्या पंपांना होणारा पुरवठा घटला आहे.* तूट: ग्रामीण भागात मागणीच्या तुलनेत केवळ ६०% ते ७०% पुरवठा होत असल्याचे पंप चालकांचे म्हणणे आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्थिती देशातील इंधन स्थितीचा आढावा घेतल्यास खालील वस्तुनिष्ठ बाबी समोर येतात - घटक | सद्यस्थिती (मे २०२६) * देशाचा इंधन साठा | भारताकडे सध्या सुमारे ९ ते १० दिवसांचा 'बफर स्टॉक' उपलब्ध आहे. * आयात अवलंबित्व | भारताची कच्चे तेल आयात अवलंबित्व ८८.७% इतके उच्चांकी आहे.

### वस्तुस्थिती काय आहे?

* टंचाईचे कारण: ही टंचाई इंधनाच्या कायमस्वरूपी कमतरतेमुळे नसून, जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली 'लॉजिस्टिक आणि सप्लाय चेन डिस्कनेक्ट' आहे. शासकीय पाऊल: महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने पुढील दोन महिन्यांसाठी डिझेलचा कोटा सुरक्षित केला असला तरी, खाजगी पंपांसाठीचा पुरवठा सुरळीत होण्यास पुढील ५ ते ६ दिवस लागण्याची शक्यता आहे.
* अफवांवर विश्वास ठेवू नका: देशभर इंधन संपले आहे, अशा अफवा चुकीच्या आहेत. केवळ ग्रामीण भागातील वितरण साखळीत तात्पुरता अडथळा निर्माण झाला आहे.